# महात्मा गांधीजींचे राष्ट्र आणि राष्ट्रवाद या संदर्भातील विचार

**डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव,** सहयोगी प्राध्यापक, म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा, जिल्हा कोल्हापूर. मोबाईल नंबर: ९४२१५८६८५१ ईमेल: jadhavjj01@gmail.com

---

**सारांश:**

आधुनिक कालखंडात ब्रिटिशांच्या साम्राज्यवादाबरोबरच राष्ट्रवाद ही संकल्पना उदयास आली. त्याचा परिणाम म्हणून युरोपमध्ये अनेक राज्यक्रांत्या घडून आल्या. त्यातुन एक देश, एक धर्म, एक वंश, एक संस्कृती यांचे एकत्रीकरण म्हणजेच राष्ट्र आणि राष्ट्रीयत्व असे मानून यूरोप खंडातील अनेक देशांची उभारणी केली गेली. त्यामुळे राष्ट्र उभारणीमध्ये वरील घटकांनाच महत्त्वाचे स्थान देण्याचा येऊ लागले. भारतात सुद्धा याच विचारांची मांडणी करण्यात येऊ लागली होती. विशेषता अरविंद घोष, लोकमान्य टिळक, सावरकर यांनी धार्मिक कल्पनांना प्राधान्य देणाऱ्या राष्ट्रवादी विचारांची मांडणी केलेली होती. मात्र पाश्चात्य राष्ट्रांचा एक देश, एक धर्म, एक भाषा, एक वंश हा सिद्धांत भारतासारख्या देशाला लागू पडणारा नव्हता. त्यामुळे महात्मा गांधीजींनी या विचारांचे खंडन केले. कारण भारत हा १८ पगड जाती-जमातींनी तसेच विविध धर्म संस्कृतींनी बनलेला असल्यामुळे त्यांनी राष्ट्र आणि राष्ट्रवादासंदर्भात वेगळ्या विचारांची मांडणी केली. त्यांनी भारतीयांच्यात राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्यासाठी सत्याग्रह, असहकार, पदयात्रा, दांडीयात्रा यांना महत्त्वाचे मानले आणि त्यामाध्यमातून देश जोडण्याचे काम केले. आपण एक आहोत ही भावना त्यांच्यामध्ये निर्माण केली. ते म्हणतात की, एखादे राष्ट्र हे तेथील भौगोलिक भूप्रदेश, लोकसंख्या, शासन व्यवस्था, सार्वभौमत्व सारख्या घटकांनी मिळून बनते. एक राष्ट्र म्हणून भारताला उभे करण्यामध्ये भारतातील कृषी संस्कृती व सर्वांना सामावून घेण्याची सामूहिक बहुजीनसी पद्धत महत्त्वाची मानून त्यांनी आपल्या विचारातूनच वैश्विक एकात्मतेच्या सिद्धांताची मांडणी केलेली दिसून येते.

**प्रस्तावना :**

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात नवसम्राज्यवादाला पर्याय देणारा विचार म्हणून महात्मा गांधींच्या विचाराकडे आणि कार्याकडे पाहिले जाते. महात्मा गांधीजींची राष्ट्रवादाची भूमिका किंवा विचार हा सर्वार्थाने युरोपियन राष्ट्रवादापेक्षा वेगळा होता. त्यानी युरोपियन राष्ट्रांच्या राष्ट्रवादी विचारप्रणालीचे खंडन केले. राष्ट्र किंवा राष्ट्रवाद ही संकल्पना प्राचीन किंवा मध्ययुगीन कालखंडातील नसून ती आधुनिक कालखंडामध्ये उदायास आलेली संकल्पना आहे. विशेषतः औद्योगिक क्रांतीनंतर जगभरामध्ये हा विचार प्रकर्षाने पूढे आलेला दिसून येतो. राष्ट्र किंवा राष्ट्रवाद यासंदर्भातील पाश्चात्य विचारवंताची भूमिका ही एक धर्म, एक भाषा, एक वंश, एक संस्कृती यांनी बनलेले किंवा यांचे एकत्रीकरण म्हणजेच राष्ट्र किंवा राष्ट्रीयत्व असे मानले गेले होते. कारण साम्राज्यवादानंतर युरोप खंडातील अनेक देशांमध्ये विविध प्रकारच्या राज्यक्रांत्या घडून आल्या होत्या. त्यातून युरोप खंडांतील अनेक देश स्वतंत्र झाले आणि त्या देशांची निर्मिती होत असताना प्रामुख्याने वरील घटकांना प्राधान्यक्रम देण्यात आला होता. त्यामूळे संपूर्ण जगातील आणि भारतातील तत्कालीन विचारवंत सुद्धा याच घटकांना महत्त्वाचे मानून राष्ट्रवादाची व्याख्या करताना दिसतात. त्या अनुषंगाने अरविंद घोष, सावरकर, लोकमान्य टिळक यांनी मांडलेला राष्ट्रवाद हा सुद्धा धार्मिक आणि अध्यात्मिक कल्पनांना प्राधान्य देणाराच होता.१ पण पाश्चात्य देशांच्यामधील हा राष्ट्रवाद किंवा ही विचारपरणाली भारतासारख्या देशाला मुळातच लागू पडणारी नव्हती. कारण भारत हा शेकडो जाती-जमाती, वेगवेगळ्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक परंपरा त्याचबरोबर भारत हा बहुधर्मीय, बहुभाषिक लोकांचा देश असल्यामुळे भारतामध्ये वरील राष्ट्रवाद विचारप्रणाली लागू पडणे शक्य नव्हते. महात्मा गांधीजींनी राष्ट्रवादा संदर्भात जे विचार मांडले ते सर्वार्थाने वेगळे होते. भारत एक राष्ट्र म्हणून जगामध्ये उद्यास येण्यास महात्मा गांधीजींचे हे विचार महत्त्वपूर्ण ठरलेले दिसून येतात. कारण महात्मा गांधीजींनी भारतातील समाजवास्तव आणि भारतातील विविध जाती-जमातींचे शेकडो वर्षांपासून असणारे व्यवहारिक संबंध आणि लोकसंस्कृती यांच्या साह्याने राष्ट्रवाद विचारप्रणाली विकसित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**महत्व:**

राष्ट्र आणि राष्ट्रवाद या संकल्पना खऱ्या अर्थाने आधुनिक कालखंडामध्ये उद्यास आलेल्या दिसून येतात विशेषता युरोपमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांती ही विचारप्रणाली झपाट्याने संपूर्ण जगामध्ये पसरत गेली. एक राष्ट्र, एक भाषा, एक धर्म, एक वंश, एक संस्कृती यावर आधारित युरोप खंडामध्ये अनेक राष्ट्रांची निर्मिती झाली होती. त्यामुळे ढोबळमानाने एकंदरीतच विचारवंतांनी राष्ट्र आणि राष्ट्रवाद या संकल्पनेपाठीमागे वरील घटकांना महत्त्वाचे मानले. मात्र भारतासारख्या देशात ही राष्ट्रवाद संकल्पना किंवा विचारप्रणाली लागू पडणारी नव्हती. कारण भारत हा शेकडो जाती-जमातींनी तसेच बहुधर्मीय, बहुभाषिक लोकांचा देश आहे. याशिवाय भारताचा विशाल भूप्रदेश यामुळे भारतामध्ये धार्मिक किंवा सांस्कृतिक राष्ट्रवाद कदापी यशस्वी होणार नाही. याची जाणीव महात्मा गांधीजींना होती. त्यामुळे भारतात गांधीजींनी भौगोलिक राष्ट्रवादाची भूमिका मांडलेली दिसून येते. भातरताची नैसर्गिक प्रादेशिक रचना हीच देशाला खऱ्या अर्थाने एकत्रित बांधून ठेवू शकते. अशी भूमिका महात्मा गांधीजींची होती. सांस्कृतिक आणि धार्मिक्तेवर आधारित राष्ट्रवाद देशाला घातक ठरू शकला असता. म्हणून महात्मा गांधीजींनी या विचारपरणालीचे पूर्णपणे खंडन केले. त्यामुळे पुढील काळात पंडित नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हीच भूमिका घेतलेली दिसून येते. कारण धार्मिक किंवा सांस्कृतिक राष्ट्रवादामधून देशामध्ये विभाजनवादी विचार पेरले गेले असते. जे पुढे जाऊन देशाच्या विभाजनास कारणीभूत ठरले असते आणि म्हणूनच महात्मा गांधीजींची राष्ट्र आणि राष्ट्रवाद या संदर्भातील भूमिका ही राष्ट्रीय अखंडत्वाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची होती हे लक्षात येते.

**गृहीतके गृहितके:**

१) राष्ट्रीय एकात्मतेसाठी धार्मिक आणि सांस्कृतिक राष्ट्रवादापेक्षा भौगोलिक राष्ट्रवाद महत्त्वाचा ठरू शकतो.

२) गांधीजींची सामूहिक, सर्व समावेशक, बहुजनसी राष्ट्रवाद विचारप्रणाली वैश्विक एकात्मतेसाठी आवश्यक ठरू शकेल.

**उद्दिष्ट्ये:**

१) महात्मा गांधीजींचे राष्ट्रवादासंदर्भातील विचार समजावून घेणे.

२) युरोपियन आणि भारतीय राष्ट्रवाद यामधील फरक समजून घेणे.

३) महात्मा गांधीजींची वैश्विक राष्ट्रवादाची संकल्पना समजावून घेणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधन लेखासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधनासाठी प्राथमिक तसेच दुय्यम संदर्भ साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**महात्मा गांधीजींचे राष्ट्र आणि राष्ट्रवाद संदर्भातील विचार:**

राष्ट्र आणि राष्ट्रीय ऐक्य निर्माण होण्यासाठी एक धर्म, एक भाषा, एक वंश, एक संस्कृती हे घटक महत्त्वाचे असतात त्याशिवाय राष्ट्र उभारणी होऊ शकत नाही. अशा पद्धतीची भूमिका पाश्चात्य विचारवंतांनी मांडली होती. खरंतर पाश्चात्यांचा हा विचार भांडवलशाहीच्या गरजेतून निर्माण झालेला होता. त्यामुळे भारतातील सुद्धा तत्कालीन विचारवंतांनी, राष्ट्रीय नेत्यांनी राष्ट्रवाद संदर्भात याच घटकांना महत्त्वाचे स्थान दिले होते. महात्मा गांधीजीनी मात्र राष्ट्र आणि राष्ट्रवाद संदर्भात आपली भूमिका वेगळी मांडलेली होती. ते म्हणतात की, भारतामध्ये शेकडो भाषा, अनेक धर्म, अगणित जाती-जमाती त्याचबरोबर प्रादेशिक संस्कृती या भारतात इंग्रज येण्याच्या पूर्वीपासून सामुदायिकरित्या एकत्रितपणे राहत आलेल्या आहेत. कारण या सर्वांचे विचार एक होते असे ते मानतात. याचा अर्थ असा होतो की, भारतामध्ये १८ पगड जाती-जमातीचे लोक असून देखील हे सर्व लोक एका दिलाने आणि परस्पर सहकार्याने राहत होते. म्हणजेच त्यांच्या आचार-विचारांच्यामध्ये सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता होती. त्याचबरोबरच त्यांनी सर्व प्रकारचे धर्म, भाषा आणि संस्कृती यांना सामावून घेणारी बहुजीनसी जीवनपद्धती विकसित केलेली होती. म्हणजेच एका विशिष्ट भूप्रदेशात गुण्यागोविंदाने राहणाऱ्या बहुजीनसी जनतेचा सहज भाव म्हणजे राष्ट्र होय. ही सर्वांना सामावून घेणारी बहुजींनसी जीवन पद्धती भारतीयांच्यात राष्ट्रवादाची भावना निर्माण करून भारतास एक राष्ट्र म्हणून उभे करण्यात महत्त्वाची आहे. असे महात्मा गांधीजींचे मत होते. **२**

राष्ट्र किंवा राष्ट्रवाद यासाठी भारताची कृषी प्रधान संस्कृती आणि त्याच्याशी जोडले गेलेले आचार विचार सुद्धा खुप महत्त्वाचे होते. असे गांधींजी म्हणतात. कारण भारत हा शेतीप्रधान देश असून त्यातून त्यांच्यात सर्वांना एकत्र बांधून ठेवणारी भौगोलिक अखंडत्त्वाची भावना निर्माण झालेली होती असा विचार महात्मा गांधीजी मांडतात. त्यामुळे गांधीजींच्या विचारातून संमिश्र आणि भौगोलिक राष्ट्रवाद विचरप्रणाली पूढे येते.३ त्यामूळेच महात्मा गांधीजी राष्ट्र या शब्दा ऐवजी प्रजा या शब्दाचा उल्लेख करतात. कारण भारत हा भिन्न धर्म, भिन्न भाषा, भिन्न संस्कृती त्याचबरोबर बाहेरून आलेल्या परकीय जमाती यांनी मिळून तयार झालेला समाज आहे. त्यामुळे पर्यायाने भारतीय समाजामध्ये बहुविविधता आणि संमिश्रता हा गुण दिसून येतो. भारताच्या या सामावून घेण्याच्या गुणधर्मामुळे गांधीजींनी राष्ट्राची संकल्पना प्रजा या शब्दातून व्यक्त केली आहे.४

भारताच्या राष्ट्रीयत्वासंदर्भात महात्मा गांधीजी नैसर्गिक भौगोलिक प्रदेशास विशिष्ट स्थान देतात. भारताचे भौगोलिक वैशिष्ट्य किंवा भारताची भौगोलिक रचना हीच खऱ्या अर्थाने भारतीय लोकांना एक राष्ट्र म्हणून उभे करण्यात महत्त्वाची भूमिका पार पडते. भौगोलिक रचनेमुळेच भारतीयांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झालेली आहे असे गांधीजी मानतात.५ त्यामुळे त्यानी धार्मिक किंवा सांस्कृतिक राष्ट्रवादाऐवजी प्रादेशिक राष्ट्रवादाच्या सिद्धांताची मांडणी केली जी पुढील काळात पंडित जवाहलाल नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतास एक राष्ट्र म्हणू उभे करत असताना भौगोलिक प्रादेशिक रचना हा घटक महत्त्वाचा मानला. थोडक्यात, भूगोलानेच भारतीय लोकांना एकत्र ठेवले असून त्यांच्या संपर्क साधण्याच्या पारंपरिक पद्धतीमुळे त्यांच्यामध्ये राष्ट्रीयत्वाच्या भावनेची जोपासना झालेली आहे.

महात्मा गांधीजी यांनी भारतीयांना एकत्र जोडण्यासाठी आणि 'आपण सर्व भारतीय आहोत' ही भावना त्यांच्या ठायी निर्माण करण्यासाठी त्यांनी जी अनेक आंदोलने, चळवळी या देशात केल्या त्यामध्ये त्यांनी प्रामुख्याने पदयात्रा, दांडीयात्रा यास महत्त्वाचे स्थान दिले. स्वयंचलित यंत्रांच्या गतिमानतेमुळे माणसातील संपर्क अधिक घट्ट होण्याऐवजी तो दुरावत जातो त्यामानाने पदयात्रा करीत गेले असता एकमेकांशी जवळीकता वाढत जाते, संपर्क येतो, नवीन भाषा शिकली जाते आणि यातूनच समाज जोडला जातो, लोकांशी संवाद साधला जातो असे त्यांचे मत होते.६ त्यामुळेच गांधीजींच्या एकंदरीतच चवळींच्याकडे पाहिले असता आपल्या लक्षात येईल की, त्यांनी सुरू केलेली असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ असो किंवा चलेजाव चा लढा असो या लढ्यामध्ये त्यांनी पदयात्रांना महत्त्वाचे स्थान दिले ज्यामुळे देश एकत्र जोडला गेला.

भौगोलिक दृष्ट्या देशाची राष्ट्रीय अखंडता निर्माण होण्यासाठी तीर्थक्षेत्रांची भूमिका फार महत्त्वाची राहिलेली आहे असे गांधींजी मानतात. देशाच्या चारही दिशांना असणारी चार तीर्थक्षेत्रे ही केवळ ईश्वर भक्ती किंवा धार्मिक कारणापूरती मर्यादित न राहता देशातील या तीर्थक्षेत्रांच्या माध्यमातून देश जोडला गेलेला आहे. आणि त्यामधून सामुदायिक अस्तित्वाची जाणीव निर्माण होऊन आपण एक राष्ट्र आहोत ही भावना भारतीयांच्यात निर्माण झाली आहे.७ महात्मा गांधींनी तीर्थयात्रांच्या संदर्भात केलेले हे विश्लेषण राष्ट्रवादाच्या संकल्पनेकडे घेऊन जाते. महात्मा गांधीजींचा राष्ट्रीय एकात्मताकडे पाहण्याचा धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन यामधून आपणास दिसून येतो. तीर्थयात्रा स्थळे किंवा पदयात्रा ही राष्ट्रीय भावना निर्माण करण्याचे महत्त्वाचे साधन आहे असे ते मानतात.

शेवटी महात्मा गांधीजी एक धर्म, एक राष्ट्र हा सिद्धांत पूर्णपणे नाकारतात कारण जगातल्या कोणत्याही भागात एका राष्ट्राचा अर्थ एक धर्म असा होत नाही. धर्मावरून वेगळ्या राष्ट्राची मागणी करणे याचे ते समर्थन करत नाहीत. तसे असेल तर हिंदू धर्मातील शैव-वैष्णव, जैन-वैदिक यांच्यामध्ये सुद्धा भेद दिसून येतात म्हणून काय ते एका राष्ट्राचे घटक नाहीत असा त्याचा अर्थ होत नाही. याउलट शास्त्री, पंडित, मुल्ला आणि धर्मवादी व्यक्तींच्या धर्मवादापासून राष्ट्रवादाला आणि इतिहासाला बाजूला काढण्याचा त्यानी प्रयत्न केला. महात्मा गांधींचा राष्ट्रवाद हा प्रादेशिक आणि धर्मनिरपेक्ष आहे. म्हणून ते म्हणतात की, माझ्या राष्ट्रभावनेत सर्व प्राणीमात्रांचा समावेश होतो. जगातील साऱ्या प्रजांचा समावेश होतो. भारत देशाने दुसऱ्या प्रजांना म्हणजेच इतर धर्मियांना नष्ट करून उभे राहावे असे त्यांना वाटत नाही. महात्मा गांधीजींनी आंतरराष्ट्रीय म्हणजेच वैश्विक राष्ट्रवादाचा विचार मांडलेला दिसून येतो. ज्याची आज एकविसाव्या शतकात नितांत गरज आहे.८

**निष्कर्ष**

१) राष्ट्रीय अखंडत्वाच्या दृष्टिकोनातून गांधीजींचे राष्ट्र आणि राष्ट्रवाद संदर्भातील विचार किंवा भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

२) सर्व समावेशक बहुजनसी राष्ट्रवाद ही गांधीजींची संकल्पना वैश्विक एकात्मतेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे.

३) एक देश, एक धर्म, एक भाषा आणि एक संस्कृती यावर आधारित राष्ट्रवादाचे गांधीजीनी खंडन केले आहे.

४) नैसर्गिक भौगोलिक राष्ट्रवाद हाच भारताला अखंड ठेवू शकतो यावर महात्मा गांधीजींचा विश्वास होता.

५) धार्मिक किंवा सांस्कृतिक राष्ट्रवाद ही विचारप्रणाली भारतात घातक ठरली असती.

**संदर्भ:**

१)पूनियानी राम, महात्म्याची दुसरी हत्या, बॉम्बे सर्वोदय फ्रेंडशिप सेंटर, मुंबई ,२००३, पृ. ३५.

२)बेन्नुर फकरूद्दीन, महात्मा गांधी प्रणित इतिहासशास्त्र आणि हिंद स्वराज्य:अन्वयार्थ, शिवजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ९२.

३) गांधींजी, मेरे सपनों का भारत, नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद, १९६०, पृ. ३१६, ३१७.

४) तत्रैव, पृ. ९३,९४.

५) गांधी मो. क., गांधीजीकी अपेक्षा, नवजीवन प्रकाशन, आमदाबाद, २०१२, पृ. १४, १५.

६)बेन्नुर फकरूद्दीन, महात्मा गांधी प्रणित इतिहासशास्त्र आणि हिंद स्वराज्य:अन्वयार्थ , शिवजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ९६.

७)तत्रैव, पृ. ९६,९७.

८)फडणीस जगण, महात्म्याची अखेर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९४, पृ. १०१,१०२.